युवकांच्या बाहूंना बलदंड करण्याचं काम हनुमान व्यायामशाळा १९३५ पासून करत होती. या व्यायामशाळेने लोकांना एकत्रित येण्याची शरीर कामावण्याची सवय लावली. ही बलोपासना देश स्वातंत्र्यासाठी अन्याय निवारणासाठी हे विचार पीळदार शरीराचे निर्धार पक्के होत गेले. आणि स्वातंत्र्याच्या दिशेने दमदार पावलं पडत गेली.

**सार्वजनिक उत्सव :** कोणत्याही देवाला केलेला नमस्कार अंतिमतः श्रीकृष्णाला पोहचतो या आशयाचं एक संस्कृत सुभाषित आहे. अगदी त्याच धर्तीवर स्वातंत्र्यपूर्वकाळात कोणत्याही मार्गाने केलेले सत्कार्य अंतिमतः देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाशी निगडित होत होते. परतूरमध्ये राममंदिर आणि मारोती मंदिरातर्फे रामनवमी आणि हनुमान जयंतीचे उत्सव दरवर्षी साजरे केले जात. देवाच्या भीतीपोटी प्रेमापोटी आणि श्रद्धेपोटी सारा गाव या उत्सवाला एकत्रित येई. या समूहमनाची ताकद देशकार्याकडे. वळवण्याचे काम उत्सवाप्रसंगी होणाऱ्या सामाजिक व ऐतिहासिक नाटकांनी केले. देश हाच देव आहे; देशसेवाच देवपूजा आहे; सर्वस्व पणाला लावून या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेच पाहिजे, हे समाजमानसावर बिंबवण्याचे काम नाटकांनी केले. विठ्ठलरावांसोबत श्री. गोविंदराव चामणीकर, श्री. बाळकृष्णराव आळवाईकर या सार्वजनिक उत्सवांची जबाबदारी सांभाळत. स्वतः विठ्ठलरावांनी म्युन्सिपाल्टी, रायगडाची राणी, एकच प्याला, भ्रमाचा भोपळा यांसारख्या नाटकांमधून काम केलेले होते.

**महाराष्ट्र परिषदेचे कार्य :** सामाजिक व सार्वजनिक कार्यात रत असलेले परतूर राजकीय नकाशावर झळकले. ते १९३७ मध्ये स्वातंत्र्य कार्यासाठी महाराष्ट्र परिषद, आंध्र परिषद कर्नाटक परिषद यांची स्थापना करण्यात आली होती. महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन घ्यायचे होते. या अधिवेशनाला निझामामार्फत कुठेही परवानगी मिळण्याची सुतरामही शक्यता नव्हती. अशा परिस्थितीत श्री. गुंडेराव यांनी महाराजा किशनप्रसाद बहादूर यांच्याकडून परतूर येथे अधिवेशनाला परवानगी मिळू शकेल याची शक्यता बोलून आणि त्या दिशेने प्रयत्न केले.

महाराजा किशनप्रसाद हे निझामाचे एकमेव हिंदू पंतप्रधान होते. धार्मिक वृत्तीच्या या गृहस्थाच्या जीवनात हिंदू-मुस्लिम संस्कृतीचा सुंदर मिलाफ साधलेला होता. १९३७ हे वर्ष, मीर उस्मान अलीखान यांच्या राज्यकारभारांचे रौप्यमहोत्सवी